# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**


पत्र क्र.रासेयो/६६३/२०१६—१७
दिनांक : २० ऑक्टोबर, २०१६

प्रति,
प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये

विषय : राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर उपक्रम संदर्भात ......

मा. महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये विशेष शिबिर उपक्रमास अन्यनसाधारण महत्व आहे. सात दिवस सलग दत्तक गाव/खेडे येथे निवास करून समाज उपयोगी विविध उपक्रम या अंतर्गत राबविले जातात. विशेष शिबिर अंतर्गत विशेष शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नोंद स्वयंसेवकांपैकी ५०% स्वयंसेवक सहभागी होणे अपेक्षित आहे.

शिबिर उपक्रम हा महत्वाचा असल्याने त्याची पूर्वतयारी योग्य रितीने करणे अपेक्षित आहे. साधारण एक महिना आधी विशेष शिबिराची तयारी महाविद्यालयीन स्तरावर सुरू करणे अपेक्षित आहे व शिबिर स्थळ, विद्यार्थी संख्या, दैनंदिन उपक्रम याची माहिती कार्यक्रम समन्वयक यांना शिबिर सुरू होण्यापूर्वी कमीत कमी सात दिवस आधी लेखी स्वरूपात सादर करणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाने सुचित केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत महाविद्यालयाने दत्तक गाव/वस्ती येथे शिबिर घेऊन स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत विविध उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. महाविद्यालयाने गाव/वस्ती दत्तक घेताना सदरचे ठिकाण हे इतर महाविद्यालयाने दत्तक घेतले नसावे याची दक्षता घ्यावी. संस्था, मंडळ यांचेकडे एकत्रित शिबिर घेतल्याने वरील उद्देश सफल होत नाही. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक गाव/वस्ती हे वेगवेगळे असावे व संबंधित गाव/वस्ती येथे निवास करून शिबिर उपक्रम राबविण्यात यावा.

विशेष शिबिरा दरम्यान स्वच्छ भारत अभियान प्रकल्पाद्वारे शैचालय बांधणे, शोषखड्डे, सेंद्रिय खत खड्डे, परसबाग विकास इ. कार्य करणे आवश्यक आहेत. एकाच गावात किंवा NGO किंवा संस्था या ठिकाणी महाविद्यालये शिबिरे सुचना करूनही घेत असतील तर अशा प्रकारच्या शिबिरास मंजूरी मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

शिबिर सहभागींमध्ये मुले व मुली एकत्रीत असल्याने महिला कार्यक्रम अधिकारी शिबिर स्थळी असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शिबिर स्थळ निवडताना वरील नोंदणीची खात्री करावी व त्यानुसार शिबिर आयोजित करून केंद्र व राज्य शासनाच्या योजने अंतर्गत विविध उपक्रम राबवुन सहकार्य करावे.

आपला विश्वासु

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग